जे. वाटूमल
साधुबेला गर्ल्स कॉलेज
साधुबेला एज्युकेशन सोसायटीचे
उल्हासनगर - महाराष्ट्र - ४२१ ००१.

FOUNDER PRESIDENT
H. H. ACHARYA SWAMI GANESHDASJI

Regd. No. E-6923 (Mumbai)
SADHUBELLA EDUCATION SOCIETY'S
J. WATUMULL
SADHUBELLA GIRLS COLLEGE
MINORITY INSTITUTION
ULHASNAGAR - 421 001.
PHONE : 0251-2731736, 2705387
Fax : 0251-2705387
E-mail : sadhubella@gmail.com

Ref. No.

Date :

028

**Government of Maharashtra**
**Competent Authority and Joint Secretary**
Minority Development Department Ministry, Mumbai-400 032

No.: Mashes - 2013.S.564 / 3 / Ka .5.

Date: -25.10.2013

## Certificate of Minority Recognition

Certificate (Sindhi) To get the recognition of the status as a minority educational institution. The application was submitted on 14.8.2013. On Based on the presentation made by the office bearers of the organization during the hearing with the concerned organization before me on 25.10.2013, the organization is prescribed as per Minority Development Department, Govt. I am satisfied that it is being run by a community of individuals or a community of linguistic (Sindhi) minorities declared by the State Government under the norms laid down. As a result, it is being declared as a minority educational institution under Article 30 of the Indian Constitution. This certificate is applicable for the State of Maharashtra only. The linguistic (Sindhi) minority status granted to the institute will be applicable to all the educational branches operating the institute. The linguistic (Sindhi) minority status conferred by it on the above educational institution will be valid from the academic year 2013-14. Concerned Institution Minority Development Department, Govt. Resolution No. Ashaisan-2012 / Q.No.21 / Ka.5 dt. 27/05/2013 It will be mandatory to continuously and specifically fulfill the criteria prescribed under May 27, 2013.

**S/d**
**(Anul Atar)**
Competent Authority and Joint Secretary
Minority Development Department,
Ministry of Government of Maharashtra, Mumbai-400032

J. Watumull Sadhubella Girls College, Ulhasnagar 421 001 Thane (India)

PRINCIPAL
J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar-421 001

MINORITY STATUS (2476x3496x16M jpeg)

T-13 J. Watumull Sadhubella Girls College

०२८

**महाराष्ट्र शासन**
**सक्षम प्राधिकारी तथा सहसचिव**
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२०१३/प्र.क्र.५६४/१३/का.५,

दिनांक :- २५.१०.२०१३

## अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

साधुबेला एज्युकेशन सोसायटी, १८/ए, भुलाभाई देसाई रोड, मुंबई-२६ या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस भाषिक (सिंधी) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थाम्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि. १४.८.२०१३ रोजी अर्ज सादर केला होता. दि. २५.१०.२०१३ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय,क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का.५ दि.२७ मे,२०१३ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या भाषिक (सिंधी) अल्पसंख्याकामधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही भारतीय संविधानाच्या कलम ३० अन्वये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला भाषिक (सिंधी) अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला भाषिक (सिंधी) अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय,क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का.५ दि. २७ मे,२०१३ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

अल्पसंख्याक विकास विभाग महाराष्ट्र शासन

J. Watumull Sadhubella Girls College Ulhasnagar 421 001 Thane (India)

(अैनुल अत्तार)
सक्षम प्राधिकारी तथा संह सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय,मुंबई-४०००३२

Capacity - 720
Strength - 626
Sindhi - 243

B.Com. Course

**PRINCIPAL**
J. Watumull Sadhubella Girls College
Ulhaasnagar-421 001

J. Watumull Sadhubella Girls College Ulhasnagar 421 001 Thane (India)

# University of Mumbai

## No. Aff./Recog.I/Admision/ (2019-20) / 06 / of 2019

**CIRCULAR:-**

The Principals of the affiliated colleges in Arts, Science, Commerce and Co-ordinator University sub center are hereby informed to follow the procedure of admission scrupulously.

1. **The reservation for different reserved categories are as under % allocation seats:-**

| | |
|---|---|
| १) अनुसूचित जाती | : १३% |
| २) अनुसूचित जमाती | : ७ % |
| ३) विमुक्त जाती (अ) | : ३ % |
| ४) भटक्या जमाती (ब) | : २.५% |
| ५) भटक्या जमाती (क) | : ३.५% |
| ६) भटक्या जमाती (ड) | : २% |
| ७) विमाप्र | : २% शासन निर्णय विद्यापीठ परिपत्रक क्र. वीसीसी/२९/३३४/१९९७ दिनांक २५/०९/१९९७ |
| ८) इमाव | : १९% |
| ९) मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) | : १६% शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१९/प्र.क्र.२२/विशी–३, दिनांक ८ मार्च, २०१९ |
| १०) खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | : १०% शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१९/प्र.क्र.२२/विशी–३, दिनांक ८ मार्च, २०१९ |
| ११) खुल्या प्रवर्गास | : शासन निर्णया प्रमाणे. |
| A) Women | : As per circular No aff/Recog./322 of 2000 dated 7th September, 2000. |
| B) Physically Handicapped | : As per circular No. Special Cell/2/2008 dated 25th January, 2008 |
| १२) 3% Seats | : खालील संवर्गातील (परिपत्रक क्रमांक मान्यता/ संलंग्नता/निर्देश/२२१, दिनांक ६.६.१९९८ प्रमाणे) |

१. बदलून आलेले केंद्रिय/ राज्य शासकिय कर्मचारी/ अधिकारी यांचे पाल्य
२. संरक्षण दलातील आजी/ माजी सैनिकांचे पाल्य
३. राष्ट्रीय /राज्य पातळीवर क्रिडा व संस्कृतिक कार्यक्रमात विशेश नैपुण्य मिळवलेले विद्यार्थी
४. विधवा/ परित्यक्ता विद्यार्थिनी
५. स्वातंत्र सैनिकाचे पाल्य/ नातवंडे

१३) Two supernumerary seats for students from Jammu & Kashmir as per University Circular No. Aff/ICC/2012-13/22 dated 8th January, 2013

2/-

**Principal**
J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar - 421 001

| | | |
|---|---|---|
| **Second Merit List** | : | Monday the 17th **June 2019** (5.00 p.m.) |
| **Verification of Documents and payment of fees** | : | Tuesday, the **18th June, 2019,**<br>Tuesday, the **18th June, 2019** and Thursday, the **20th June, 2019** (up to 4.30 pm) (on working days) |
| **Third & Final Merit List** | : | Thursday, the **20th June, 2019** (5.00 p.m.) |
| **Verification of Documents and payment of fees** | : | Friday, the **21st June, 2019,**<br>Friday, the **21st June, 2019** and Monday, the **24th June, 2019** (up to 5.00 pm) (on working days) |

Note:- Link for online application of pre-admission online Enrolment forms will be available from 29th May, 2019 on website:- ***mum.digitaluniversity.ac.***

The Principals of the Affiliated College and Co-ordinators, sub centers Thane and Ratnagiri are hereby directed to strictly adhere to the schedule of admission.

(Dr. Ajay Deshmukh)
REGISTRAR

Mumbai-400 032
28th May, 2019

**Principal**
J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar - 421 001

J. Watumull Sadhubella Girls College Ulhasnagar 421 001 Thane (India)

**2. The Quota:-**

**Minority Colleges:-**

अल्पसंख्यांक संस्थेमधील प्रवेशाबाबत सेंट झेविअर्स कॉलेज आणि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ मायनॉरिटी एज्युकेशनल इन्स्टिटयुशन v/s मुंबई विद्यापीठ आणि स्टेट ऑफ महाराष्ट्र यांनी मा. उच्च न्यायालयात सादर केलेल्या याचिका क्र. १७२६/२००१ बाबत दिनांक १२/१०/२०१७ रोजी दिलेल्या निकालानुसार व परिपत्रक क्र.. SPL.Cell/2018-19/03/2018 अनुसार प्रवेश प्रक्रिया राबवावी.

15% Management quota will be applicable to all the colleges including Minority Colleges, as per University Circular No. Spl.Cell/(68)/218/2005 dated 3rd June, 2005

1. **In house Students and Minority be admitted first** as per practice followed in the preceding years for admission to F.Y.B.A./ B.Sc./B. Com. Classes only.
2. Fees:- Strictly as presebied by the University . Further fees be charged from Reserved category students as per circular no वि.क्र./भासशि(२४)/३६०/२००४ दिनांक २५ ऑगस्ट, २००४ and circular no वि.क्र./भासशि/पदवि/२/२०१३ दिनांक ७ जून, २०१३
3. No. College shall conduct its own CET test for admission to any course of University unless it is an autonomous college.

Further, they are requested to establish the Admission cell/ Committee Comprising of Senior Teaching Staff inclusive of representative of Reserved Category for smooth conduct of the admission process. **The vacant representative seats should be indicated on notice board** and to be converted as per the prescribed procedure.

The Colleges are further informed that they should report regarding merit list and overall admission process to the Deputy Registrar (Eligibility and Enrolment).

Mumbai- 32
28th May, 2019

(Dr. Ajay Deshmukh)
Registrar

**Principal**
J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar - 421 001

J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar 421 001 Thane

# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०१९-२०/3
दिनांक -23 मे, २०१९

परिपत्रक :-

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र, इत्यादी महाविद्यालये (अल्पसंख्याक महाविद्यालये वगळून) आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक, प्राचार्य/संचालक, स्वायत्त महाविद्यालये व संस्था यांना कळविण्यात येते की, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र. २०/विशि-३ दिनांक ८ मार्च, २०१९ नुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत येणा-या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थाखेरीज सर्व अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नीत असणारी सर्व अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये व स्वायत्त महाविद्यालयामधील विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गास तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी अनुक्रमे १६ व १० टक्के जागा आरक्षित ठेवण्याबाबतचे शासन परिपत्रक सोबत जोडले आहे.

सर्व संबंधितांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त शासन परिपत्रकानुसार शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गास तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी जागा आरक्षित ठेवण्याबाबतची कार्यवाही काटेकोरपणे करण्यात यावी.

उपरोक्त संदर्भांकित शासन परिपत्रक विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी -

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र, इत्यादी महाविद्यालये (अल्पसंख्याक महाविद्यालये वगळून) आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक, प्राचार्य/संचालक, स्वायत्त महाविद्यालये व संस्था तसेच सर्व उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ.

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

**Principal**
J. Watumull Sadhuballa Girls College
Ulhasnagar - 421 001

J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar 421 001
Thane (India)

महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गास तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी जागा आरक्षित ठेवण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. २२/विशि-३
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ८ मार्च, २०१९.

संदर्भ :-
१) विधी व न्याय विभागाचा सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, दि. ३० नोव्हेंबर, २०१८.
२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२ फेब्रुवारी, २०१९.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या वर्गांच्या प्रगतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांच्या आरक्षणासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या आणि पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींची तरतुद करण्यासाठीचा अधिनियम उपरोक्त संदर्भ क्रमांक १ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या दि. ३० नोव्हेंबर, २०१८ च्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील मुद्दा क्र. ४ (१) (क), अन्वये राज्यातील अनुदानित तसेच विनाअनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाच्या एकूण १६% जागा मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.

तसेच संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता १०% जागा आरक्षित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४ अन्वये शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाबाबतचे आवश्यक आदेश सर्व संबंधीत विभागांनी तात्काळ निर्गमित करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

सामान्य प्रशासन विभागाने उपरोक्त शासन निर्णयान्वये आदेशीत केल्यानुसार मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गास १६% जागा तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १०% जागा महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता आरक्षित करण्याबाबत या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठांना निर्देश देण्याकरिता याबाबतचे शासन परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Principal
J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar - 421 001

Sadhubella Girls College Watumull Ulhasnagar 421 001 Thane (India)

शासन परिपत्रकः-

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ ला अनुसरुन महाराष्ट्र राज्यातील सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गास १६% जागा तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १०% जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात.

२. शासनाने निर्धारित केलेले शैक्षणिक संस्थातील प्रवेशामधील सदर आरक्षण राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत येणाऱ्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थाखेरीज सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, विधी विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्नीत असणारी सर्व अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये व स्वायत्त महाविद्यालये यांना लागू होईल. सदर आदेशाची प्रभावी अंमलबजावणी होईल हे पाहण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठांची राहील.

३. शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी विद्यापीठांनी/संस्थांनी नियम / परिनियम तयार केले असतील आणि त्यामध्ये विविध सामाजिक घटकांचे आरक्षण दर्शविण्यात आले असेल तर या आरक्षणाच्या अनुषंगाने त्या नियमात/ परिनियमात संबंधितांनी विहित कार्यपध्दतीनुसार आवश्यक त्या सुधारणा तातडीने कराव्यात.

४. सर्व विद्यापीठांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०३०८१४४०३०९२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SIDDHARTH KHARAT

Digitally signed by SIDDHARTH KHARAT ... c=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SIDDHARTH KHARAT

(सिध्दार्थ खरात)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे विशेष कार्यअधिकारी, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
६. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु / कुलसचिव.
७. सर्व विधि विद्यापीठांचे कुलगुरू/ कुलसचिव.

Principal
J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar - 421 001

J. Watumull Sadhubella Girls College Ulhasnagar 421 001 Thane

८. सर्व स्वंय अर्थसहाय्यीत / अभिमत विद्यापीठांचे कुलगुरू/ कुलसचिव
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
१२. सर्व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१३.उप सचिव, (विशि) (मशि) (तांशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१४. उप सचिव (१६अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.निवड नस्ती - कार्यासन विशि-३.

Principal
J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar - 421 001

महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्याबाबत

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. जीईसी-१०००/(१२३/२०००)/तांशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १७ एप्रिल, २०००

प्रस्तावना:-

भारताच्या संविधानात स्त्री-पुरुष भेद न ठेवता समानतेचे तत्व हा नागरीकांचा मूलभूत हक्क मानण्यात आला आहे. तसेच महिलांच्या बाबतीतही घटनेत सकारात्मक धोरण स्विकारण्यात आले आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने संधी देणे अपेक्षित असले तरी विविध शिक्षण अभ्यासक्रमाकरिता स्त्रियांना समान संधी प्रत्यक्षात मिळत नाही. स्त्रियांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यादृष्टीने ठोस प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यानुसार महिलांचे सक्षमीकरण आणि समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग करून सर्वांगीण मानवी विकासाच्या विविध क्षेत्रामध्ये सकारात्मक परिणाम घडून आणण्यासाठी महिलांच्या शिक्षणाकडे जाणिवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन शासन निर्णय दि. २२.६.१९९४ अन्वये शासनाने महिलांना शासकीय नोकरीमध्ये ३० टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत. यामागील हेतू साध्य होण्याकरिता आता महिलांना पदवी अभ्यासक्रमाकरिता ३० टक्के आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासनाचा विचार होता.

शासन निर्णय:-

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्यात येत आहे.

सदरचे आरक्षण बिनराखीव व राखीव या दोन्ही प्रवर्गासाठी लागू राहील. जर बिनराखीव जागा १०० असतील तर त्यापैकी ३० जागा महिलांकरिता आरक्षित राहतील.

तसेच सदरचे आरक्षण हे सध्या विविध सामाजिक प्रवर्गाकरिता विहित केलेल्या संविधानात्मक राखीव जागा अंतर्गत समांतर आरक्षण (Horizontal) [illegible] राहील, उदाहरणार्थ असे की, सध्या संविधानातील तरतुदीनुसार [illegible] अनुसूचित जातींच्या करिता १३ टक्के जागा आरक्षित आहेत. त्यापैकी त्यातील ३० टक्के आरक्षण हे अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिता ठेवण्यात येईल व जर या

प्रवर्गातील विद्यार्थी

(कृ.मा.प.)

Principal
J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar - 421 001

क्रमाने

प्रवर्गातील किमान पात्रता असलेल्या महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील. म्हणजेच जर प्रवेशाकरिता एखाद्या विद्याशाखेसाठी प्रथम वर्षाकरिता १०० जागा असतील तर त्यापैकी १३ जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता सध्या असलेले आरक्षण विचारात घेऊन त्यापैकी ३० टक्के म्हणजेच ४ जागा ह्या अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिता आरक्षित राहतील.

वर उल्लेखिलेल्या पद्धतीनेच इतर सर्व प्रवर्गांकरिताही सध्या असलेल्या आरक्षणांतर्गत महिलांना ३० टक्के समांतरपणे आरक्षण ठेवण्यात येईल. तसेच ज्या पदवी अभ्यासक्रमांकरिता मूल्यमापनात व मुक्त जागांवर देण्यात येतात ह्या प्रवेशा अंतर्गत देखील ३० टक्के आरक्षण महिलांकरिता देण्यात येईल.

सध्या सर्व तंत्र निकेतनांमध्ये पदविका अभ्यासक्रमासाठी महिलांकरिता शासन निर्णय क्र. डब्ल्यूसबीपी-१०२५/(२०१९)/तांशि-५, दि. १७.१.१९९६ अन्वये ठेवलेल्या २५ टक्के आरक्षणात वाढ करुन आता ते ३० टक्के इतके करण्यात येत आहे.

सदरच्या आरक्षित जागांवर जर महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर या रिक्त जागा त्याच शैक्षणिक वर्षात पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील व या रिक्त जागांचा पुढील शैक्षणिक वर्षात अनुशेष धरला जाणार नाही.

वैद्यकीय शिक्षण विभाग आणि कृषि व पदुम विभागांतर्गत येणाऱ्या सर्व पदवी अभ्यासक्रमांकरिता आदेश संबंधित विभागाकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदरचे आरक्षणविषयक आदेश शैक्षणिक वर्ष सन २०००-२००१ पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही

(प्र. ह. क्षीरसागर)
शासनाचे सह सचिव

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, उद्योगधंदे-सेवा-समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विद्यापीठांचे कुलगुरु व कुलसचिव
सर्व सहसंचालक तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये.
प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र महाविद्यालये, तंत्र निकेतने व संस्था (तंत्र शिक्षण संचालकामार्फत)
प्राचार्य, सर्व वरिष्ठ महाविद्यालये (उच्च शिक्षण संचालकामार्फत)
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक,

J. Watumull Sadhubella Girls College, Ulhasnagar 421 001 Thane (India)

Principal
J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar - 421 001